वर्ष : ०४, अंक : २५०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

दैनिक
अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

बुलडाणा, सोमवार, दि.२१ एप्रिल २०२५

## आतील पानात

- बांगलादेशात अल्पसंख्य खतरे में !
- विद्येच्या माहेरघरात विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात !
- दुचाकीस्वार युवकास चाकूचा धाक दाखवून लुटले...

श्री बाल विकास केंद्र
डॉ. आकांक्षा श्रीधर मढवी
व्यावसायिक थेरपिस्ट
+91 87791 10823
परिस्थितीत विशेषज्ञता मिळवा
ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर
विकासात्मक विलंब
डाउन्स सिंड्रोम
शिकण्याची अक्षमता
अति चंचलता अवस्था
बोलण्यात विलंब
तोंडी समस्या
तोतरेपणा
वर्तनातील अडचणी
आमच्या सेवा
ऑक्युपेशनल थेरपी
स्पीच थेरपी
संवेदी एकीकरण थेरपी
न्यूरोडेव्हलपमेंट मूल्यांकन
विशेष शिक्षण (हळू शिकणाऱ्यांसाठी)
ओम साई सिद्धी, दुकान क्रमांक ०२, प्लॉट क्रमांक १३३-१३६, रेल्वे आरोग्य युनिटसमोर सेक्टर २३,जुईनगर, नवी मुंबई, ४००७०५.

# त्र्यंबकमध्ये व्हीआयपी तिकिटांचा काळाबाजार!

## ६०० रुपयांच्या पास तब्बल २ हजारांना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, त्र्यंबकेश्वर :** त्र्यंबकेश्वर मंदिरात दर्शनासाठी जास्त पैसे घेऊन खोटे पास विकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. २२ मार्च रोजी घडलेल्या घटनेप्रकरणी मंदिर ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित माचवे यांनी त्र्यंबक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ मार्च रोजी गुजरातच्या सुरत येथील भाविक दर्शनासाठी आले असता मंदिराच्या प्रवेशद्वारावर भेटलेल्या व्यक्तीने व्हीआयपी दर्शनासाठीची प्रत्येकी दोनशे रुपये मूल्याची तीन तिकिटे संबंधित भाविकांना दोन हजार रुपयांत विकली.




मात्र, दर्शन पाससाठी संबंधिताचा आधार क्रमांक जुळवला जातो. तिन्ही पास इतरांच्या आधार क्रमांकावर काढलेली असल्याने सुरतच्या भाविकांचे आधार क्रमांक त्याच्याशी जुळले नाहीत. त्यामुळे मंदिराच्या प्रवेशद्वारी असलेल्या संगणकीय स्कॅनिंग यंत्राने ती स्वीकारली नाहीत. साहजिकच सुरक्षा रक्षकांनी या भाविकांना प्रवेश दिला नाही, त्यांना बाहेर जाण्यास सांगितले.

याबाबत आपली फसवणूक झाली असल्याचे लक्षात आल्याने भाविक चिराग दालिया यांनी ट्रस्ट कार्यालयात धाव घेतली. अध्यक्षांना तक्रारअर्ज दिला. सदर व्यक्तीचे नाव नारायण असल्याचा उल्लेख अर्जात आहे.

**सीसीटीव्ही फुटेज राखून ठेवले**

ट्रस्टने याबाबतचे सीसीटीव्ही फुटेज तपासून पाहिले असून, ते राखून ठेवण्यात आले आहे. २३ मार्च २०२५ रोजी अमित माचवे यांनी दिलेल्या तक्रार अर्जावरून मंगळवारी (दि. १५ एप्रिल) फिर्याद दाखल करून घेण्यात आली. याबाबत नारायण या व्यक्तीवर कलम ३१८ (४) प्रमाणे ठकबाजीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# जिल्ह्यात ५५ गावे, २९३ वाड्यांना ६४ टँकरने पाणीपुरवठा

## टँकर मंजुरीचे अधिकार उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांना...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** उन्हाची तीव्रता वाढू लागली, तशी जिल्ह्यातील पाणीटंचाई भासणारी गावे व वाड्यांची संख्याही वाढू लागली आहे. सध्या ५५ गावे व २९३ वाड्या-वस्त्यांवरील १ लाख १८ हजार ८५२ लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी ६४ टँकर सुरू आहेत. यंदा फेब्रुवारीअखेरीसच पाणीटंचाई जाणवू लागली आहे. दर वर्षीप्रमाणे संगमनेरमधील पठार भागात प्रथम टँकर सुरू करण्यात आले. राज्य सरकारने टँकर मंजुरीचे अधिकार उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांना प्रदान केले आहेत. टँकरच्या मागणीचे प्रस्ताव पाठवणे व त्यास मंजुरी देण्याची प्रक्रिया आता 'जलदूत' या ॲपच्या माध्यमातून होत आहे. जिल्ह्यात संगमनेर, अहिल्यानगर, पाथर्डी, पारनेर या तालुक्यांत पाणीटंचाईच्या झळा अधिक



पारनेर तालुक्यात १५ गावे,१२९ वाड्यांवरील ३५ हजार ५९२ लोकांना १९ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. पाथर्डीत ११ गावे,६३ विड्यांमधील ३३ हजार ८०० लोकांना १५ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. पारनेर मधील १ गाव,३१ वाड्यांना ४ टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असून, शहरातील ५ हजार लोकांची तहान या टँकरने भागविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाने पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन विहिरी व कूपनलिका अधिग्रहित करण्यास सुरुवात केली आहे. गावांसाठी २, तर टँकर भरण्यासाठी २ अशा ४ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

आहेत. पारनेरच्या ग्रामीण भागाबरोबरच पारनेर शहरातही पाणीटंचाई भासू लागली आहे. शहर परिसरातील ३१ वाड्यांना ४ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. पारनेरमधील १५ गावे १२९ वाड्यांना १९ टँकरने पाणीपुरवठा होत आहे. त्यानंतर पारनेर, पाथर्डी, अहिल्यानगर तालुक्यात पाणीटंचाई भासू लागल्याने ज्या गावांकडून टँकरची मागणी होते. त्यांना तातडीने प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशानुसार टँकर मंजूर केले जात आहेत. चार तालुक्यांतील पाणीटंचाई जाणवत असलेल्या एकूण ५५ गावे, ५९३ वाड्या-वस्त्यांना ६४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. या माध्यमातून एकूण १ लाख १८ हजार ८५२ लोकांची तहान भागवली जात आहे. संगमनेर तालुक्यात २० गावे, ४६ वाड्यांना १८ टँकर सुरू असून, ३२ हजार ५३९ लोकांना पाणीपुरवठा होत आहे. अहिल्यानगर तालुक्यात ८ गावे, २४ वाड्यांना ८ टँकरद्वारे १३ हजार ९२१ लोकांना पाणीपुरवठा केला जात आहे.


# अजित पवार यांच्या हस्ते आज ६० पिंक ई- रिक्षा वितरीत होणार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, पुणे :** महिला व बाल विकास विभागाच्या वतीने पुणे जिल्ह्यासाठी ४ हजार महिलांना पिंक ई- रिक्षा वाटप करण्याचे उदिदष्ट दिले आहे. पुणे जिल्हयात २० ते ५० वर्षे वयोगटातील ३ हजार २३० इच्छुक महिलांचे अर्ज मिळाले आहेत.

त्यापैकी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने १ हजार ७२६ लाभार्थ्यांना मंजुरी मिळाली आहे. यापैकी पहिल्या टप्प्यातील ६० लाभार्थी महिलांना २१ एप्रिल २०२५ रोजी, दुपारी १ वाजता कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ६० कायनेटिक ग्रिन कंपनीचे पिंक ई-रिक्षा वितरीत करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, महिला व बाल विकास विभाग सचिव डॉ. अनुपकुमार यादव , विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांतपुलकुंडवार, आयुक्त महिला व बाल विकास नयना गुंडे, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंग, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,



मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपस्थित राहणार आहे.

महिला व बाल विकास विभागाच्या वतीने आठ जिल्हयातील महिला व मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, सशक्तीकरणास चालना देण्यासाठी तसेच महिला व मुली यांना सुरक्षित प्रवास करणे यासाठी शहरात इच्छुक महिलांना पिंक रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व रिक्षा चालविण्यासाठी इतर सोई सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील गरजू महिलांना रोजगारासाठी पिंक ई- रिक्षा योजना सुरू करण्यात आलेली आहे.

# गर्भपात करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश, धावत्या वाहनातच व्हायची चाचणी

**दि.२०, बुलडाणा :** वाशीम जिल्ह्यातून महिलेस गर्भलिंग निदानासाठी कारमध्ये घेऊन डोणगाव शिवारात येत येणाऱ्या हिंगोली जिल्ह्यातील एका एजंटला बुलढाण्यातील पीसीपीएनडीटीच्या पथकाने पाठलाग करून पकडले. मेहकर तालुक्यातील शेलगाव देशमुख शिवारात गुरुवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या कारवाईने गर्भलिंग निदानाचे रॅकेट असल्याचे उघड झाले आहे. गजानन विठ्ठल वैद्य (वय ३८) असे आरोपीचे नाव असून, तो हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्याच्या माझोडचा रहिवासी आहे. मेहकर ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनीता हिवसे यांनी दिलेल्या तक्रारीवरून डोणगाव पोलिसांनी विविध कलमांनुसार गुन्हे नोंदवून त्याला अटक केली. बेकायदा गर्भलिंग निदान करून गर्भपात करणारी टोळी बुलढाण्यासह लगतच्या हिंगोली जिल्ह्यात सक्रिय आहे. त्यामुळे बुलढाण्याचा पीसीपीएनडीटी विभाग दक्ष झाला आहे. दरम्यान, या गर्भलिंग निदानासंदर्भात माहिती समजताच सापळा रचण्यात आला. त्यासाठी डमी महिला तयार करण्यात आली.आरोपी गजानन वैद्य याने वाशीम जिल्ह्यातील कुकसा फाट्यावरून एमएच-४९-एएस-६९६६ क्रमांकाच्या गाडीमध्ये महिलेस बसवून डोणगावकडे निघाला. मात्र, मध्येच पथक मागावर असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याने वाहन शेलगाव देशमुख मार्गाने वळविले. अखेर पाठलाग करून त्याला पकडण्यात आले. इकडे डोणगाव पोलिस डोणगाव-मालेगाव रस्त्यावर नाकाबंदी करून बसले होते. नंतर पोलिस शेलगाव शिवारात दाखल झाले. वाहनाची झडती घेतली असता चार सेफ्टी ग्लोव्हज, पाच नग ब्लड कलेक्शन बॉटल, सीरिंज असे साहित्य आढळून आले.

**आरोपी म्हणतो, मीच डॉक्टर !**

आरोपी गजानन वैद्य याने मी डॉक्टर असून गर्भपात करतो. दुसरे डॉक्टर येऊन गर्भलिंग निदान करतील व नंतर मी गर्भपात करेल, असे सांगून त्याने महिलेजवळून २८ हजार रुपये घेतले होते. गर्भलिंग निदान व गर्भपात करवून देणाऱ्या एजंटचे मेहकर तालुक्यातील काही डॉक्टरांशी कनेक्शन असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्या दृष्टीने तपास केला जात आहे.

## थोडक्यात

### हॉस्पिटल ऑन व्हील्स रेल्वेकडून शेगाव स्थानकात सुविधा





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, बुलडाणा :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाचे डीआरएम पांडे यांच्या संकल्पनेतून साकारलेली 'रुद्र- हॉस्पिटल ऑन व्हिल्स' आज, शनिवारी शेगाव रेल्वे स्थानकात दाखल झाली. 'रुद्र'मध्ये विविध वैद्यकीय सुविधा उपलब्ध असून आज रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी व उपचार करण्यात आले.

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात नऊ जिल्ह्यांचा समावेश असून १ हजार ५३ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचा हा विभाग आहे. विविध रेल्वेस्थानकावर कार्यरत कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना वैद्यकीय सेवा, विशेषतः तज्ज्ञांच्या सल्ला मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. जवळपासच्या शहरांमध्ये पॅनेलमध्ये समाविष्ट रुग्णालये उपलब्ध आहेत. मात्र, अनेकांसाठी कामाच्या थकवणाऱ्या वेळापत्रकानंतर लांबचा प्रवास करणे हे एक कठीण काम आहे. ही गंभीर समस्या ओळखून, भुसावळ विभागाने एका जुन्या 'थ्री- एसी कोच'चे पूर्णपणे कार्यरत रुग्णालयात रूपांतर केले. ही आरोग्य रेल्वे आज, शनिवारी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव स्थानकावर पोहचली. कोचमध्ये, तज्ज्ञांची एक टीम, गर्भवती मातांसाठी स्त्रीरोग सेवा, नेत्ररोग समस्यांचे निदान आणि उपचार, ईसीजी मशीन आणि रक्त तपासणी, आदी सुविधा उपलब्ध आहेत. यावेळी शेकडो कर्मचारी रुग्णांवर तपासणी आणि उपचार करण्यात आले. भुसावळ विभागाचे डीआरएम पांडे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला. आजच्या शिबिरात सीएमएस भुसावळच्या डॉ. मंगला नारायणे, सीनियर डीएमओ भुसावळ डॉ. पवन खंडेलवाल, डॉ. दत्ता जाधव, डॉ. गोरख, डॉ. जितेश ठाकरे, एडीएमओ डॉ. अखिलेश कश्यप, डॉ. अखिलेश कलावटे, स्वास्थ निरीक्षक लाभिणी पाटील, परिवहन निरीक्षक पी. एम. पुंडकर, रेल्वे स्थानक प्रबंधक मोहन देशपांडे, तिकीट निरीक्षक एन. आर. कारळे, मुख्य बुकिंग पर्यवेक्षक हर्षल महाजन यांनी सेवा दिली.

### नागपुरकर घाबरले ! आकाशातून पडला ५० किलोचा धातुचा तुकडा




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, नागपुर :** नागपुर जिल्ह्याचा उमरेड तालुक्यात शनिवारी पहाटे ४ वाजता एक धातूचा तुकडा घरावर पडल्याने एकच खळबळ उडाली आहे. आकाशातून हा तुकडा इमारतीवर पडला तेव्हा मोठा आवाज झाल्याच स्थानिक लोकांनी सांगितलं. आवाज येताच सर्व लोक घाबरून घराबाहेर पडले. कोसे लेआऊटमधील स्थानिक नागरिक अमेय बसवेश्वर यांचा घरावर धातूचा तुकडा पडल्यानं छतावरील भिंतीचा भागही तुटल्याची माहिती आहे. पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. हा धातूचा तुकडा कशाचा आहे, हे अद्याप कळू न शकल्याने पुढील तपास सुरू केला आहे. हा तुकडा पोलीस स्टेशनला नेण्यात आला आहे. हा तुकडा ५० किलो वजनाचा असून, अंदाजे १० ते १२ एमएम जाडीचा आणि ४ फूट लांब आहे. हा धातूचा तुकडा नेमका कशाचा आहे, याचा तपास सुरू आहे. आकाशातून पडलेला हा तुकडा नेमका कशाचा आहे हे तपासले जात आहे.

# संपादकीय



## ज्ञानापेक्षा शहाणपणा महत्त्वाचा



शिक्षण आणि ज्ञानाच्या माध्यमातून माणसाला शहाणपणा मिळतो. मात्र, केवळ ज्ञान असून उपयोग नाही, जर ते योग्य प्रकारे वापरण्याचे शहाणपण असायला हवे . जसे तलवार असली तरी ती चालवता येत नसेल, तर तिचा उपयोग शून्य ठरतो. त्याचप्रमाणे, ज्ञान असले तरी त्याचा व्यवहारात उपयोग करण्याची समज नसल्यास ते निरुपयोगी ठरते.

आज समाजात पाहिले,तर असे आढळते की अनेकांनी आपला शहाणपणा गहाण ठेवला आहे. व्यसनामुळे स्वतःचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक नुकसान होत असल्याचे ज्ञान असूनही, अनेकजण व्यसनाच्या आहारी जातात. हे दर्शवते की त्यांच्याकडे शहाणपणा नसल्यामुळे ते आपल्या जीवनावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत.

शहाणपणा हा फक्त ज्ञानातूनच नव्हे, तर अनुभवातूनही मिळतो. अनुभवी आणि शहाण्या व्यक्तींच्या मार्गदर्शनानेही तो प्राप्त होतो. काहीजण संकटांत सापडल्यावर शहाणे होतात, तर काहीजण अहंकारामुळे शहाण्या लोकांचे सल्ले ऐकण्यास नकार देतात. मला शहाणपणा शिकवू नको! असा त्यांचा दृष्टिकोन त्यांना मागे ओढत राहतो. काही जणांना भौतिक प्रगती मिळाल्यावर वाटते की, तेच सर्वात शहाणे आहेत. दोन-चार गाड्या, मोठे बंगले आणि भरपूर जमीन म्हणजेच शहाणपणा, असा गैरसमज त्यांच्या प्रगतीसाठी घातक ठरतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, माणसाने आयुष्यभर जरी शिकायचे ठरवले, तरी तो ज्ञानसागराच्या केवळ कडेलाच पोहोचू शकतो. याचा अर्थ, ज्ञान हे अथांग आहे ; आणि माणूस संपूर्ण जीवनात त्यातील अत्यल्प भागच आत्मसात करू शकतो. त्यामुळे ज्ञानाचा उपयोग करून शहाणपणा मिळवणे अधिक महत्त्वाचे ठरते. तो शहाणपणा आधी स्वतःसाठी, नंतर समाज, देश आणि मानवतेच्या कल्याणासाठी वापरला पाहिजे.

ज्ञानाचे शहाणपणात रूपांतर होण्यासाठी ग्रंथलेखन महत्त्वाचे आहे. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी केला. त्यांच्या ग्रंथांचे आजही पारायण केले जाते. अनेकांचे जीवन या ग्रंथांतील उपदेशामुळे सकारात्मक बदलले आहे. एका ज्योतीने हजारो ज्योती प्रज्वलित होतात, या प्रमाणे हे ग्रंथ समाजाला नीतिमत्ता आणि सदाचाराचे मार्ग दाखवतात. बहिणाबाई चौधरी यांसारख्या अशिक्षित कवयित्रीने आपल्या व्यवहारज्ञानातून मिळालेला शहाणपणा आपल्या हृदयस्पर्शी कवितांमधून मांडला:

**जग जग माझ्या जीवा**
**असं जगनं तोलाचं**
**उच्च गगनासारखं**
**धरत्रीच्या रे मोलाचं**

जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन त्यांच्या कविता देतात. लेखक, विचारवंत आणि साहित्यिक हे लोकांना आपल्या लेखनाच्या माध्यमातून जीवन जगण्याची योग्य दिशा दाखवतात. त्यांनी मांडलेल्या विचारांमुळे अनेकांना आनंददायी, समाधानी आणि सुसंस्कृत जीवन जगता येते.

'पुढच्यास ठेच, मागचा शहाणा' या म्हणीनुसार अनुभवी आणि वडीलधाऱ्या व्यक्तींच्या सल्ल्याचा आदर केला पाहिजे. अनुभवातून मिळालेला शहाणपणा शेवटी जीवन समृद्ध करण्यासाठीच असतो. म्हणूनच, ज्ञानापेक्षा शहाणपणा महत्त्वाचा असतो!

# बांगलादेशात अल्पसंख्य खतरे में !




बांगलादेश पूजा उद्यापन परिषदेच्या बिरल युनिटचे उपाध्यक्ष भाबेश चंद्र रॉय यांचे अपहरण करून त्यांची हत्या केल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली. त्यांच्या राहत्या घरातून त्यांचे अपहरण करण्यात आले आणि जवळच्या गावात नेऊन त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. बेशुद्ध अवस्थेत त्यांना घरी सोडण्यात आले. त्यांना रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. ५ ऑगस्टला बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. दंगली झाल्या, प्रचंड प्रमाणात जाळपोळ झाली. शेख हसीना यांनाही देश सोडून भारतात पलायन करावे लागले. या दंगलीमध्ये स्थानिक हिंदूंना जाणीवपूर्वक लक्ष केले जाऊ लागले, हिंदूंना घरात घुसून मारहाण होऊ लागली, त्यांची घरे, दुकाने लुटून ती जाळण्यात येऊ लागली, त्यांच्या जमिनी हडपण्यात आल्या, त्यांना त्यांच्याच घरातून हाकलले जाऊ लागले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले होऊ लागले, देवतांच्या मूर्तींची तोडफोड होऊ लागली, हिंदू स्त्रियांवर, बालकांवर अत्याचार होऊ लागले. ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेले हे हिंदुविरोधी लोण आजही कायम आहे. ढाका येथील मानवाधिकार संघटना 'ऐन ओ सलीश केंद्र'च्या गेल्या मासातील एका अहवालात असे म्हटले होते की, बांगलादेशात हिंदूंची घरे, मंदिरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठान यांची तोडफोड करण्याच्या एकूण १४७ घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये अनुमाने ४०८ घरांची तोडफोड करण्यात आली, ज्यात ३६ जाळपोळीच्या घटनांचा समावेश आहे. याखेरीज अल्पसंख्यांकांच्या मालकीच्या व्यावसायिक प्रतिष्ठानांची तोडफोड करण्याच्या ११३ घटना घडल्या आहेत. मागील आठ महिन्यांपासून बांगलादेशमध्ये अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून देशातील बहुसंख्यांकांकडून जाणीवपूर्वक अल्पसंख्यकांना लक्ष केले जात आहे. बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराचे पडसाद भारतातही उमटले असून भारतातील हिंदुत्ववादी संघटनांनी बांगलादेशातील या दडपशाहीच्या विरोधात आजतागायत देशभर आंदोलने केली आहेत. भारतातील अल्पसंख्यांकाची तळी उचलण्यास सदैव तत्पर असणारा अल्पसंख्यांक आयोग बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या विरोधात मूग गिळून गप्प का असाही सवाल आज विचारला जात आहे.

१९४७ साली पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये एक तृतीयांश हिंदू होते. २०२२ मध्ये जेव्हा देशात जनगणना झाली तेव्हा तेथे ७.९६ टक्के हिंदू शिल्लक राहिल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली होती. फाळणीनंतर तेथील हिंदूंची संख्या कमी होत गेली तर मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. फाळणीपासूनच स्थानिक अल्पसंख्य हिंदूंना लक्ष केले जात आहे, स्थानिकांच्या छळाला कंटाळून दरवर्षी लाखो हिंदू देशातून पलायन करतात. हे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बांगलादेशातील हिंदूंना दिली जाणारी अन्याय्य वागणूक हा जुना विषय असला तरी गेल्या सात-आठ महिन्यांत तेथील हिंदूंची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे, हे असेच चालत राहिले तर पुढील काही महिन्यांतच बांगलादेशात नावालाही हिंदू शिल्लक राहणार नाही. याउपरांत बांगलादेशातील गरिबीला कंटाळून बांगलादेशी मुसलमानांचे लोंढेच्या लोंढे भारतात येत आहेत. आजमितीला ही संख्या १० कोटीहून अधिक झाली आहे भारतातील विकसनशील शहरी भागात बांगलादेशी नागरिकांच्या वस्त्या तयार झाल्या आहेत. येथील स्थानिक झोपडपट्टी दादा पैशांच्या मोबदल्यात या बांगलादेशी घुसखोरांच्या निवाऱ्याची, नोकरी व्यवसायाची आणि कागदपत्रांची व्यवस्था करून देतात. आजमितीला अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये आणि अनधिकृत कामांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याचेउघड होत आहे.घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलण्याचा कायदाही अस्तित्वात आहे; मात्र त्याची कठोरपणे अंमलबजावणीच केली जात नाही. एकीकडे बांगलादेशातील हिंदू नामशेष होऊ लागला आहे तर दुसरीकडे भारतात आलेले बांगलादेशी घुसखोर भारताची अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणू लागले आहेत. भारतात अवैधपणे राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना हाकलून देण्यासाठी देशभरात विशेष मोहीम राबवण्यात यावी तसेच भारताच्या शेजारील राष्ट्रांत अल्पसंख्य हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात भारताने आंतराष्ट्रीय पातळीवर आवाज उठवावा अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे; मात्र दर वेळेस अशा काही घटना घडतात तेव्हा त्या घटनेचा तीव्र निषेध करण्याव्यतिरिक्त सरकारकडून अन्य काही पावले उचलली जात नसल्याचे लक्षात येते. आज जसे बांगलादेशात हिंदूंना लक्ष केले जात आहे तसे ज्यू लोकांना लक्ष करण्याची हिम्मत कोणत्याही देशाची नाही. ज्यू लोकांवर जगभरात कोठेही हल्ले झाले तर इस्त्रायल पेटून उठतो, ज्यू लोकांना संरक्षण देण्यासाठी आक्रमक होतो. भारत अशा प्रकारची भूमिका केव्हा घेणार आहे ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

# ५ हजारांची लाच घेणाऱ्या हवालदारासह दोघांना अटक

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१९, शिळफाटा (ठाणे) :** पोलिस कारवाई टाळण्यासाठी खासगी व्यक्तीमार्फत ५ हजारांची लाच स्वीकारणाऱ्या गणेश राठोड या पोलिस हवालदारासह दोघांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) बुधवारी अटक केली. याप्रकरणी डायघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील तक्रारदार यांनी त्यांच्या मैत्रिणीच्या नावे असलेली एक दुचाकी मुंब्रा येथील एका डीलरला विकली होती. या दुचाकीचे ना हरकत प्रमाणपत्र न दिल्याने या डीलरने त्याचे पैसे परत मागितले होते. पैसे मागण्यासाठी डीलरने तक्रारदार यांना धमकी दिली. त्यामुळे तक्रारदार यांनी पोलिस नियंत्रण कक्षाकडे मदत मागितली होती. तेव्हा हवालदार राठोड हे घटनास्थळी गेले.



**एसीबी पथकाने सापळा रचून केली कारवाई**

**१)** डीलर आणि तक्रारदार यांना १५ एप्रिल रोजी डायघर पोलिस ठाण्यात आणले. यावेळी दोन्हीकडील वाद मिटवत राठोड यांनी तक्रारदार यांना डीलरचे पैसे परत करण्यास पोलिसांकडून २० दिवसांची मुदत दिली.

**२)** हे प्रकरण मिटवून पुढील कारवाई न करण्यासाठी राठोड यांनी तक्रारदाराकडून २० हजारांची मागणी केली. त्यानंतर तडजोडीअंती पाच हजार रुपये घेण्याचे मान्य केले.

**३)** या प्रकरणी ठाणे एसीबीकडे १६ एप्रिल रोजी तक्रार दाखल केली होती. दरम्यान, १६ एप्रिल रोजी एसीबी पथकाने सापळा रचून कारवाई केली. राठोड यांनी पाच हजार रुपये लाच्च मागितल्याचे स्पष्ट झाले. बुधवारी हवालदाराने पाच हजारांची रक्कम टपरीचालक आकाश गुप्ताकडे देण्यास सांगितले.

## पाणीबाणी..

पातळी खाली घसरते
धरणे झाली भयभीत
दारेउघडता कुरकुरता
निर्णयस्वताचं स्तंभित

अक्राळ विक्राळ चित्रे
भेडसे दुष्काळ अतित
पुढेमहिने ते कसे काढे
चिंतेत समय रे व्यतित

सोडलेपाणी पोचे कुठे
उत्तरेकरतात अचंबित
सुधारलो नाही कसे हो
इशारे मिळेजरी गर्भीत

अपव्यय पाणी साठ्या
कायम वागतोयं गुर्मीत
पाण्यासारखा खर्चकरे
तरीगळती ती नियमीत

पाईपलाईनफुटतेकशी
सवाल सतावे संभ्रमीत
किती खोल खोदणारं
रहस्य दडले या भूमित

टँकर्समाफिया सोकले
कुणाला मिळे नवनीत
भूगर्भ कोरडा ठक्क रे
असमानता रे अवनीत

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# वाचक पत्र

## विद्येच्या माहेरघरात विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात !

राज्याच्या शिक्षण विभागाने राज्यात अनधिकृतपणे चालू असणार्या १३०० शाळांची पडताळणी केली असता त्यातील ८०० हून अधिक शाळांच्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत ज्यामध्ये ५१ शाळा केवळ पुण्यातील आहेत. पुणे जिल्ह्यातील शिक्षण विभागाने पुणे महानगरपालिका आणि जिल्हाकार्यक्षेत्रामध्ये असलेल्या या ५१ शाळांवर बंदीची कारवाई केली आहे. पुणे जिल्ह्यात १०० हून अधिक बोगस शाळा असाव्यात, असे शिक्षण क्षेत्रांतील जाणकारांचे अनुमान आहे. त्यामुळे पालकांनी शाळेमध्ये प्रवेश घेतांना 'यू.आय.डी. पोर्टल'वर (युनिक आयडेंटिफायर) जाऊन शाळेचा नोंदणी क्रमांक पडताळून पहावा. ज्यावर शाळा शासनमान्य आहे किंवा नाही याबाबतची माहिती मिळते, असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे. विद्येच्या माहेरघरात शिक्षण व्यवस्थेची असलेली ही स्थिती पाहता या अनधिकृत शाळांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे काय असा प्रश्न पडतो. मुलांना शालेय शिक्षणासोबत नैतिक मूल्यांचे शिक्षण शाळांतून मिळत असते; मात्र वरील आकडे पाहता शालेय शिक्षण देणाऱ्या शाळाच भ्रष्टाचारातून उभ्या राहिल्या असल्याचे चित्र दिसून येते. अन्य क्षेत्राप्रमाणे शिक्षण क्षेत्राचाही व्यापार झाला आहे हे आता जगजाहीर झाले आहे.राज्यात बिनदिक्कतपणे चालणाऱ्या अनधिकृत शाळा हे या व्यापाराचेच द्योतक आहेत. या अनधिकृत शाळांना जागा, बांधकामाचा परवाना, वीजपुरवठा, पाणीपुरवठा नेमका कोणाच्या आशीर्वादाने होतो ? या अनधिकृत संस्थांना पाठबळ देणारे स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांची चौकशी होणार का ? अनधिकृत शाळांना टाळे लावले गेल्याने शाळांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे त्यामुळे त्यांचे दायित्व कोणाचे ?

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# नागपुरात अग्नितांडव! डम्पिंग यार्डमध्ये भीषण आग...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, नागपूर :** शहरातील भांडेवाडी डम्पिंग यार्डमध्ये शनिवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास लागलेली आग दिवसभरात रौद्ररुप धारण करत गेली. कचऱ्याच्या प्रचंड ढिगामध्ये लागलेल्या या आगीमुळे संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरले आहे. तर काही किलोमीटर अंतरावरूनही धूर आणि आगीच्या ज्वाळा स्पष्टपणे दिसत होत्या. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे .

अग्निशमनची गाडी सुद्धा जळून खाक

आग लागल्याची माहिती मिळताच नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान शर्थीचे प्रयत्न करत होते. मात्र आगीची तीव्रता इतकी होती की, अगदी अग्निशमनची एक गाडीच आगीच्या विळख्यात सापडली. ही गाडी आगीच्या इतक्या जवळ गेली की अचानक वाऱ्याने दिशा बदलल्याने आगीच्या ज्वाळा थेट त्या वाहनावर आल्या. काही क्षणात संपूर्ण गाडीने पेट घेतला आणि बघता-बघता ती पूर्णपणे जळून खाक झाली. सुदैवाने त्या गाडीत असलेले कर्मचारी वेळेवर बाहेर पडल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. भांडेवाडी डम्पिंग यार्ड हे नागपूर शहरातील सर्व कचऱ्याचे केंद्रीकृत ठिकाण आहे. शहरातील प्रत्येक भागातून जमा होणारा कचरा येथे आणला जातो.

मात्र, या कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन न झाल्यामुळे वेळोवेळी अशा प्रकारच्या आग लागण्याच्या घटना घडत असतात. स्थानिक अधिकाऱ्यांच्या मते, यंदाची आग नेहमीपेक्षा अधिक तीव्र आणि वेगाने पसरलेली होती. ज्वलनशील पदार्थ, उष्ण हवामान आणि कचऱ्यातील संभाव्य रसायनांच्या प्रतिक्रियेमुळे आग भडकली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राष्ट्रीय लाचलुचपत प्रतिबंधक आयोगाच्या सदस्य पदी डॉ.निलेश राणे यांची नियुक्ती



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२०, मुंबई :** डॉ.निलेश राणे यांची दिल्ली येथून राष्ट्रीय लाचलुचपत प्रतिबंधक आयोगाच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली.

राष्ट्रीय लाचलुचपत प्रतिबंधक आयोग हे प्रथम गुन्हेगारी, भ्रष्टाचार, अन्यायाच्या तक्रारीची व समस्येची निष्पक्षपणे चौकशी करून तपास करते आणि सत्यापर्यंत पोहोचते. त्यानंतर कोणताही विलंब न करता ते सर्वोच्च अधिकाऱ्यांना संबंधित समस्येकडे सरकारचे लक्ष वेधून कळवते. तसेच भारत आणि परदेशातील नागरिकांच्या मानवी हक्कांचे समर्थन करण्यासाठी सातत्याने कार्य करते, या आयोगाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. डॉ.निलेश राणे यांची आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची पद्धत ही अतिशय शांत आणि शिस्तबद्ध आहे, त्यांनी खूप कमी वयामध्ये देश व परदेशात आपल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेण्यात सर्वांनाच भाग पाडले आहे.

डॉ.निलेश राणे यांची नियुक्ती झाल्याबद्दल देशातून व राज्यातून सर्वच क्षेत्रातील मान्यवर त्यांना शुभेच्छा देत आहेत.

## दुचाकीस्वार युवकास चाकूचा धाक दाखवून लुटले



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२०, कुंडलवाडी :** धर्माबादकडून कुंडलवाडी मार्गे बिलोलीकडे जात असताना दुचाकीस्वार युवकास गोदावरी नदीवरील बाभळी पूल ते शेळगाव थडी या गावच्या दरम्यान चाकूचा धाक दाखवून व डोळ्यांमध्ये मिरचीची पूड टाकून लुटल्याची घटना दि.१९ रोजी रात्री सव्वा बारा वाजेच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी तीन अज्ञात आरोपीविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.परंतू या गोदावरीच्या परिसरात रात्रीला ये जा करणाऱ्या प्रवाशासाठी मात्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

धर्माबाद तालुक्यातील बन्नाळी येथील रहिवासी कपिल शंकर वाघमारे हा युवक त्याचा चुलत भाऊ संदीप वाघमारे व मित्रासोबत धर्माबाद येथून बिलोलीकडे वाढदिवस कार्यक्रमासाठी १९ एप्रिल रोजी रात्री सव्वा बारा वाजेच्या सुमारास मोटारसायकल (क्र. एमएच २६ सी के ८६८२) वरून जात असताना गोदावरी नदीवरील बाभळी पूल ते शेळगाव थडी या गावच्या दरम्यान आले असताना पाठीमागून धर्माबादकडून एका मोटारसायकलवर आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींनी 'गाडी थांबव' असे म्हटल्यानंतर कपिल वाघमारे यांनी मोटारसायकल थांबवली. यानंतर मोटारसायकलवरील बसलेल्या एकाने कपिल वाघमारे यांच्या डोळ्यांमध्ये मिरचीची पूड टाकली व सोबतच्या एकाने चाकू दाखवला. त्यावेळी घाबरून कपिल वाघमारे व सोबत असलेला चुलत भाऊ संदीप वाघमारे व त्याचे मित्र शेळगाव थडी या गावाच्या दिशेने पळत असताना अज्ञात तीन व्यक्तींनी त्यांचा पाठलाग करून चाकूचा धाक दाखवून कपिल वाघमारे यांच्या जवळील ८ हजार रुपयांचा मोबाईल, नगदी ४० हजार रुपये व ५० हजार रुपयांची मोटारसायकल असा एकूण ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच धर्माबादचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत संपत्ते, कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी कपिल वाघमारे यांच्या तक्रारीवरून कुंडलवाडी पोलीस ठाण्यात तीन अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## सुजित पाटलांच्या पुढाकारातून वासुंद्यामध्ये विकासाची दौड

### डॉ.सुजय विखेंकडून विकासकामांना पाठबळ...



**अक्षराज : वसंत रांधवण**


**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** सत्ता नसतानाही तालुक्यात ठोस विकासकामे राबवून नेतृत्वाची छाप सोडणारे सुजित झावरे यांनी श्री बिरोबा यात्रा उत्सवानिमित्त वासुंदे येथे भव्य बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले. देवकृपा फाउंडेशनच्या माध्यमातून पार पडलेल्या या शर्यतीचे उद्घाटन माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी नव्याने बांधलेल्या बैलगाडा घाटाचे लोकार्पण देखील करण्यात आले.

या कार्यक्रमात बोलताना डॉ.सुजय विखे पाटील म्हणाले, सुजित झावरे यांनी केवळ कार्यक्रम नव्हे तर विकासाच्या दिशेने भरीव पावले उचलली आहेत. बिरोबा मंदिरासाठी सभामंडप आणि इतर आवश्यक कामांसाठी निधी देण्याचे आश्वासन मी देतो. त्यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून सर्व विकासकामे पूर्ण केली जातील, असे ठामपणे सांगितले. संगमनेर, जुन्नर, शिरूर, आंबेगाव आणि नगर भागातील स्पर्धकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत शर्यतीला रंगत आणली. या उपक्रमामुळे गावात सणासारखा माहोल निर्माण झाला होता. या वेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, बा.ठ.झावरे, भास्करराव उचाळे, अरुणराव ठाणगे, अमोल साळवे, शिवाजी रोकडे, सुधामती कवाद, ॲड. बाबासाहेब खिलारी, शंकर महांडूळे आदी मान्यवर उपस्थित होते.

वासुंदे गावात सुजित झावरे यांच्या नेतृत्वाखाली विकासकामे आणि सांस्कृतिक उपक्रमांची सांगड घालण्यात येत असून, यामुळे गावाला नवी दिशा मिळाली आहे. स्थानिकांनी त्यांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा करत, अशाच पुढाकारामुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

# येरमाळ्यात घुमला 'आई राजा उदो'चा गजर...

## घुगरी महाप्रसादानंतर येडेश्वरी देवीच्या यात्रेची सांगता...



**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.२०, कळंब :** 'आई राजा उदो उदो'चा जयघोष करत येडेश्वरी देवीच्या पालखीची आमराई मंदिरामध्ये विधिवत महापूजा, महाआरती झाली. त्यानंतर घुगरी महाप्रसादाच्या वाटपाने चैत्र पोर्णिमा यात्रा महोत्सवाची सांगता झाली.

यात्रेनिमित्त येथील आमराई मंदिरात गेले पाच दिवस येडेश्वरी देवीच्या पालखीचा मुक्काम होता. अखेरच्या, पाचव्या दिवशी घुगरीचा महाप्रसाद वाटपानंतर देवीच्या पालखीचे मुख्य मंदिराकडे प्रस्थान झाले.

तत्पूर्वी यात्रेत विविध कार्यक्रम झाले. यात्रेत चुना वेचण्याचा मुख्य कार्यक्रम असतो. चुन्याच्या रानात पालखी आल्यानंतर हा सोहळा रंगतो. यावेळी पंधरा लाखांहून अधिक भाविकांनी पालखीवर चुनखडी टाकली. आमराई मंदिरात मुक्कामादरम्यान पालखीच्या दर्शनासाठीही गर्दी उसळली होती. आज यात्रेचा अखेरचा दिवस असल्याने भाविकांनी पालखी दर्शनासह घुगरी प्रसादासाठी गर्दी केली होती. शिवाय विविध वस्तूंच्या खरेदीसाठीही यात्रेत गर्दी झाली होती.

**घुगरी प्रसादाची परंपरा...**

गावातील घरोघरी जाऊन रब्बी हंगामातील नवीन ज्वारी, गहू, हरभरा जमा केला जातो. त्यातून घुगरी महाप्रसाद तयार करून त्याचे वाटप केले जाते. आज दुपारी चारला आमराई मंदिरात देवीच्या पालखीची महापूजा, आरती झाल्यांतर पुजारी, मानकरी, ग्राम पंचायत पदाधिकाऱ्यांच्या हस्ते घुगरीचे वाटप झाले. या महाप्रसादासाठी अनेक जिल्ह्यांतून भाविक आले होते.

**डोंगरावरील मंदिरात प्रस्थान...**

घुगरी महाप्रसादानंतर यात्रेची सांगता होते आणि पालखीचे प्रस्थान मुख्य डोंगरावरील मंदिराकडे होते. गावातील मुख्य चौकांतून पालखी जाते. पालखीच्या पाठवणीसाठी गावातील प्रत्येक घरासमोर महिलांनी सडा शिंपून रांगोळी काढली होती. फुलांद्वारे पालखीला पायघड्या घालण्यात आल्या. पालखी घरासमोर आल्यानंतर पालखीच्या खांदेकऱ्यांच्या पायावर पाणी वाहून चुरमुरे, लाह्या, बत्तासे, रेवड्यांचा प्रसाद वाहून नंतर प्रसादाचे वाटप झाले.

**मंदिर रंगविण्याची परंपरा...**

भाविकांनी वेचलेली चुनखडी गोवऱ्यांच्या भट्टीत भाजण्यात आली. भाजलेली चुनखडी पोत्यात भरून मानकऱ्यांच्या हस्ते पूजा, बैलगाडीद्वारे ती मंदिराकडे नेण्याची परंपरा आहे. भाजलेली चुनखडी रात्री भिजवून दुसऱ्या दिवशी पहाटे मंदिराला चुन्याने रंगविण्याची प्रथा आहे. या कामासाठी आज आलेले भाविक मंदिरात मुक्कामी रहातात, तर काही पहाटे मंदिर रंगविण्यासाठी येतात.

# गुहागर विकासासाठी अराजकीय फोरम निर्माण होणार...

## खराब रस्त्यावर चागले कार्पेट टाका गुहागर प्रेमी नागरिकांची मागणी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२०, गुहागर :** गुहागर ते शासकीय विश्रामगृह या प्रमुख मार्गांवर खड्डे पडून रस्ता अत्यंत धोकादायक बनला आहे, सदर रस्त्याचे काम लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी रविवार दिनांक २० एप्रिल २०२५ रोजी गुहागर प्रेमी नागरिकांची गुहागर शहर येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील जानकी निवास येथे महत्वपूर्ण सभा पार पडली.

सदर बोलावलेल्या बैठकीत गुहागर प्रेमी नागरिकांनी विविध प्रश्नी आपले विचार मांडले असून गुहागर ते शासकीय विश्रामगृह या मार्गांवरील जे धोकादायक खड्डे पडले आहेत ते येत्या ३० तारखेच्या आत चांगले कार्पेट मारून जनतेला वाहतुकीसाठी चांगला रस्ता प्रशासनाने द्यावा अशा मागणीचा एकमुखी ठराव करण्यात आला आहे.बैठकीत गुहागर शहरातील पर्यटन व विकास तसेच मुख्य रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. उद्या सोमवारी दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी मोठया संख्येने यावर दाद मागण्यासाठी व निवेदन देण्यासाठी लोकशाही दिनात नागरिकांना बोलावण्यात आले असून मोठया संख्येने उद्याचा लोकशाही दिन साजरा होणार असे संकेत देण्यात आले आहे, आज संपन्न झालेल्या मिटिंग मध्ये एकच मागणी करण्यात आली असून येत्या ३० एप्रिल पर्यंत खड्डेमय रस्ता गुळगुळीत झाला पाहिजे अशी मागणी नितिन खानविलकर व सुमित आठवले यांनी केली, बैठकीला अनिल शिंदे माजी सरपंच सतीशदादा शेट्ये सामाजिक कार्यकर्ते विशवनाथ रहाटे पत्रकार पराग कांबळे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

**गुहागर फोरम निर्माण करणार...**

दरम्यान आजच्या बैठकीत अनेक विषयावर चर्चा करण्यात आली यामध्ये गुहागर पर्यटन व सर्वसामान्य जनतेचा व शहराचा विकास कसा होईल जास्तीत जास्त पर्यटक कसे गुहागरकडे आकर्षित होतील, व्यावसायिक कसे वाढतील तसेच होलसेल मार्केट कसे निर्माण करता येईल यावर विशेष चर्चा व नियोजन करण्यात आले, त्यानुसार गुहागर च्या विकासासाठी अराजकीय फोरम सर्वांशी विचारविनिमय करून निर्माण करण्यात येणार असल्याचे पत्रकार पराग कांबळे यांनी सांगितले,यासाठी गुहागर शहरातील व तालुक्यातील प्रत्येक सेवाभावी मंडळाचे अध्यक्ष यांना निमंत्रित करण्यात येणार आहे, गुहागर प्रेमी जागृत नागरिक (अराजकीय) ग्रुप तयार करून गुहागर विकासासाठी 'गुहागर फोरम तयार करण्यात येणार असल्याचे अनिल शिंदे यांनी म्हटले आहे,

माजी सरपंच सतीशदादा शेट्ये यांचे अध्यक्षतेखाली आजची बैठक मोठया उत्साहात पार पडली यावेळी गुहागर च्या प्रगतीसाठी राजकारण विरहित सर्वांनी कामं करावे असे नागरिकांना आवाहन करण्यात आले. शेवटी सुमित आठवले यांनी अभिनंदन व आभार व्यक्त केले.

आजच्या या मिटिंग मुळे गुहागर पर्यटन व शहर विकासाला नव्याने चालना मिळेल असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला, सदर सभेला शहरातील विविध नागरिक हजर होते, सामाजिक कार्यकर्ते विशवनाथ रहाटे माजी सरपंच सतीशदादा शेट्ये शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व गुहागर एज्युकेशन सोसायटी चे माजी खजिनदार अनिल शिंदे युवा कार्यकर्ते नितीनशेट खानविलकर सुमित आठवले पत्रकार पराग कांबळे आदी प्रमुख कार्यकर्ते यांचेसह शहर परिसरातील व तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# वाढलेल्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड व संवर्धनासाठी उपाययोजनेची मागणी



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि. २०, शहापूर (ठाणे) :** या वर्षी राज्यात तापमान वाढले आहे याची दखल घेऊन तापमानवाढ आणि पर्जन्यमानचा असमतोल टाळायचा असेल तर लवकरात लवकर आवश्यक उपाययोजना करणे गरजेच आहे. पावसाळा सुरू होण्यास दोन महिन्यांचा कालावधी असून वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाची आवश्यक पूर्वतयारी केल्यास व पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड केल्यास भावी काळातील पर्यावरणीय संकटाचा सामना करण्यास सकारात्मक परिणाम दिसून येईल. या बाबत संबंधित यंत्रणांना सदर वृक्षारोपण कार्यक्रमासंर्भात आपल्या माध्यमातून सजग करून यशस्वीपणे व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी ठाणे यांना निर्देशित करावे अशी मागणी शहापूर मधील माऊली प्रतिष्ठान चे अध्यक्ष संतोष शिंदे यांनी खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. शहापूर तालुका हा सह्याद्री पर्वतरांगेनजीक घनदाट वनसंपदेने समृद्ध असा तालुका अशी अनेक वर्षांपासून तालुक्याची ओळख आहे. विविध प्रकारच्या वनराईने भरगच्च असा हा परिसर पर्जन्यमान आणि हवामानासाठी अतिशय पोषक असे वातावरण निर्माण करणारा आहे, परंतु, गेल्या काही वर्षात या जंगलश्रीमंत परिसरात विकासाचे वारे वाहू लागले. मुंबई- नाशिक महामार्गाचे चौपदरीकरण, औद्योगिक कंपनीचा चा विस्तार, समृद्धी काँक्रिट महामार्ग, विविध प्रकारचे वसाहतप्रकल्प (बंगलो प्रोजेक्ट ) असे विकास प्रकल्प या तालुक्यात आले. रस्ते आणि रेल्वेच्या कनेक्टिव्हिटीमुळे रहिवाशी लोकसंख्या वाढली. लोकवस्ती वाढली. दळणवळण आणि सोयी सुविधा वाढीस लागल्या, मात्र ही सर्व विकासकामे होत असताना वृक्षराजीने नटलेला तालुका मात्र उजाड होऊ लागला आणि कॉन्क्रीटची जंगले वाढीस लागली.हा विकास आपल्या दूरगामी अधोगतीला आणि नाशाला कारणीभूत तर ठरणार नाही ना हेही तितकेच महत्त्वाचे आहे.अलिकडच्या काळातील तालुक्यातील तापमानाचा उच्चांक(४६ डिग्री सेल्सिअस) आणि घटलेले व अनियमित पर्जन्यमान हे आगामी धोक्याची घंटा तर नाही ना अशी भयावह चिंता नागरिकांना सतावत आहे. विकासकामे जनतेच्या प्रगतीसाठी आवश्यकच आहेत, परंतु हा विकास साधत असताना पर्यावरण रक्षणासाठीचे निर्देश आणि नियमावलीचे तंतोतंत आणि काटेकोर पालन होणेही तेवढेच क्रमप्राप्त असते. वृक्षतोडीमुळे झालेल्या पर्यावरणाचे नुकसान मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून भरून काढणे व पर्यावरण संतुलन राखणे आवश्यक आहे मात्र अशी कोणतीही उपाययोजना संबंधित विकासप्रकल्पांकडून पुरेशा प्रमाणात झालेली नाही. किंबहुना वृक्ष लागवडीच्या बाबतीत कमालीची उदासीनता असून संबंधित यंत्रणांचे कमालीचे दुर्लक्ष होत आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

# हिवरे बाजारच्या डोंगराला वणवा ; ग्रामस्थांच्या पाच तासांच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** आदर्शगाव म्हणून ओळख असलेल्या हिवरे बाजार गावालगतच्या डोंगराला शनिवारी (दि.१९ एप्रिल) दुपारी १ वाजता आग लागली. आग लागल्यानंतर ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील तरुण, ग्रामस्थ आणि ग्रामवन समितीचे सदस्य यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. सलग पाच तास अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवण्यात ग्रामस्थांना यश आले. सध्या उन्हाळ्याचे तापमान वाढल्याने डोंगर परिसर कोरडा झाला असून, छोट्याशा ठिणगीनेही आग वेगाने पसरते. यावेळी शेजारील गावातील काही शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेताच्या बांधाला आग लावल्यामुळे ती डोंगराच्या दिशेने गेली आणि वनसंपदा धोक्यात आली.

ही आग मागील महिन्यात डोंगर परिसरात लागलेल्या तिसऱ्या वणव्याची घटना असून, ग्रामस्थांनी या अगोदरही अशाच प्रकारच्या आगी विझविल्या आहेत. विशेष म्हणजे, सन २०१८ पासून आजपर्यंत २३ वेळा हिवरे बाजार ग्रामस्थांनी डोंगरावर लागलेल्या आगी स्वतःहून विझवल्या आहेत. कोणतीही शासकीय मदत न घेता, केवळ संघटितपणा, सामाजिक जाणीव आणि पर्यावरणप्रेमाच्या बळावर हिवरे बाजारने संकटांशी सामना केला आहे. गावकऱ्यांची ही बांधिलकी इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वीतेसाठी शासन कटीबद्ध - मुख्यमंत्री फडणवीस

## विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड संस्थेचे सहकार्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, मुंबई :** नागरिकांचे आरोग्य प्राधान्यक्रमावर ठेवून नागरिकांच्या आरोग्य विषयक अनेकविध योजना शासनामार्फत सुरू करण्यात आल्या आहेत. वयस्क लोकांमध्ये मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता टाळण्यासाठी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वी करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. शासनाचे हे मिशन पूर्णत्वास नेण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड या संस्थेने सर्वतोपरी सहकार्यासाठी पुढाकार घेतला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरू आहे. शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची २०१८ मध्ये नव्याने सुरवात करण्यात आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड (थउङ) ही संस्था इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (आयजीएमसी), नागपूर यांना मदत करत आहे. डब्ल्युसीएल या संस्थेच्या माध्यमातून आयजीएमसी, नागपूर यांनी गेल्या वर्षभरात साधारण चार हजार मोतीबिंदूच्या शस्त्रक्रीया केल्या आहेत.



तसेच शासनासोबत केलेल्या कराराच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन स्वप्नपूर्तीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रम राबवून यापुढील तीन वर्षात दरवर्षी साधारण चार हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी देखील ही संस्था सहकार्य करणार आहे.

ही संस्था विदर्भातील ग्रामीण भागामध्ये शिबीर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे त्या रुग्णाचे निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहोचवून त्यांच्यावर मोफत उपचार करतील. तसेच या मार्फत रुग्णालयांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील. डब्ल्यूसीएल संस्थेचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या यशस्वीतेसाठी शासनाला असलेले सहकार्य पाहून इतर स्वयंसेवी संस्था देखील या कामात पुढाकार घेतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

# परभणी महानगरपालिकेच्यावतीने मालमत्ता कर व नगररचना विभागाच्या अर्जांसाठी शिबिरे

## १ ते ७ मे या कालावधीत प्रभागनिहाय शिबीरे; शिबिराचा लाभ घेण्याचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आवाहन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, परभणी :** परभणी शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी परभणी महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कर विभाग व नगररचना विभागाशी संबंधित अर्जांवर तत्पर कार्यवाही करण्याच्या उद्देशाने दिनांक ०१ मे ते ०७ मे २०२५ या कालावधीत प्रभागनिहाय शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांचे यशस्वीरित्या नियोजन करण्याची सूचना पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी मनपा आयुक्तांना केली आहे. तसेच या शिबिराचा नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन पालकमंत्री यांनी केले आहे. परभणी शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडे तसेच नगररचना विभागाकडे विविध प्रकारचे अर्ज दाखल होत असतात. त्यामध्ये नागरिकांच्या मालमत्तेच्या क्षेत्रफळाची दुरुस्ती, नागरिकांच्या मालमत्तेचे हस्तांतरण/नामांतरण, नागरिकांच्या मालमत्तेला लागू केलेल्या टॅक्स संदर्भात दुरुस्ती तसेच अतिरिक्त टॅक्स लागू केला असल्यास त्याबाबतची दुरुस्ती इत्यादी स्वरूपाच्या अर्जाचा समावेश असतो. तसेच काही प्रकरणात भूमी अभिलेख विभाग व मनपाचा नगररचना विभाग यांचे अभिप्राय घेऊन अर्जावर तत्पर कार्यवाही करणे वेळोवेळी आवश्यक असते.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध मालमत्तांना शासन निर्देशाप्रमाणे टॅक्स लागू होणे आवश्यक आहे, जेणेकरून नागरिकांच्या मालमत्तेला मिळकत कर लागू केल्यास नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेणे शक्य होते. त्यामुळे या अर्जांवर वेळेवर आणि प्रभावी निर्णय घेण्यासाठी नियोजित कालावधीत शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर शिबिरांमध्ये नागरिकांच्या अर्जांचे परीक्षण करण्यात येणार असून, संबंधित विभागांकडून आवश्यक अभिप्राय घेऊन निर्णय घेतला जाणार आहे. ही शिबिरे प्रभागनिहाय आयोजित केली जाणार असून नागरिकांनी आपल्या प्रभागातील ठिकाणी दिलेल्या दिवशी उपस्थित राहून आपल्या अर्जासंबंधी माहिती व कागदपत्रांसह सहभाग नोंदवावा, असे आवाहन पालकमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर मार्फत करण्यात आले आहे.

# मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात.




मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निग, ॲक्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो.

जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात.

गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ - पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात.

आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत सीबीएएससी चा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळणार आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे.

अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# थोडक्यात

## उत्कृष्ट कामगिरी केलेल्या हवालदाराला सन्मानचिन्ह देऊन सत्कार




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२०, उल्हासनगर (ठाणे) :** उल्हासनगर पोलीस ठाणे मध्ये एका गुन्ह्याची नोंद गुन्हा रजिस्टर नंबर ९०४/२०२४ भा.न्या.स. कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे न्यायालय गुन्हा क्रमांक १६४६/२०२४ मधील आरोपी नाव १) वाहिद मंजूर खान वय २२ वर्ष २) राहुल अशोक सिंग परिहार वय २३ वर्षे, यांना न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग दुसरे न्यायालय उल्हासनगर आर. एम. ठवरे यांनी सदर गुन्ह्यात बी एन एस एस २६४ प्रमाणे दोषी ठरवून आरोपीत यास ७ महिने साध्या कारावासाची शिक्षा व रोख रक्कम ३००० हजार रुपये दंडाची शिक्षा फर्माविण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार ६५७१ भगवान पाटील नेमणुक-उल्हासनगर पोलीस ठाणे यांनी केला असुन त्यांनी सदर गुन्हयात नमुद दोन्ही आरोपींना अटक करून गुन्हयात चोरीस गेलेला मुद्येमाल त्यांचे कडुन हस्तगत केलेला आहे. आरोपी विरूध्द सबळ पुरावा गोळा करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते. पोहवा/५०३९ बी. व्ही. धिर्डे, पोशि/७६६९ टि. के. महाले यांनी नमुद गुन्हयातील फिर्यादी, पंच व साक्षीदार यांना साक्षकामी न्यायालयात हजर ठेवुन त्यांचे साक्षी पूर्वी त्यांना गुन्हयाचे बाबत ब्रिफींग करून आत्मविश्वास वाढविल्याने सदर गुन्हा शाबित होवुन आरोपीस शिक्षा झाली आहे. नमुद न्यायालय पैरवी अंमलदार यांचा पोलीस ठाण्याचे वतीने वपोनि विष्णू ताम्हाणे यांनी सन्मानचिन्ह देवुन गौरविण्यात आले. सदरची उत्कृष्ट कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग कल्याण संजय जाधव, पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ उल्हासनगर सचिन गोरे, सहायक पोलीस आयुक्त, उल्हासनगर अमोल कोळी, वपोनि विष्णू ताम्हाणे, उल्हासनगर पोलीस ठाणे, पोनि गुन्हे चंद्रहार गोडसे, उल्हासनगर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हा तपासीक अंमलदार पोहवा/६५७१ भगवान पाटील, सरकारी अभियोक्ता पी.के धांडे, न्यायालय पैरवी अंमलदार पोहवा/५०३९ बी. व्ही. धिर्डे, पोशि/७६६९ टि.के.महाले यांनी केली आहे.

## शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य सरकारचे ठोस पाऊल

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२०, दापोली (रत्नागिरी) :** रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली-खेड-मंडणगड मतदारसंघ हा आंबा, काजू, सुपारी, नारळ, कोकम व मासळी यांसारख्या शेती व मत्स्य उत्पादनांसाठी प्रसिद्ध आहे. मात्र, स्थानिक बाजारपेठेचा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे येथील शेतकऱ्यांना आपली उत्पादने विक्रीसाठी जवळपास १५० ते २०० किमी अंतरावरील रत्नागिरी येथील बाजार समितीकडे जावे लागत होते. परिणामी वाहतूक खर्च, वेळ व श्रम यांचा मोठा बोजा शेतकऱ्यांवर पडत होता. या पार्श्वभूमीवर, राज्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी दापोली, खेड आणि मंडणगड या तीनही तालुक्यांमध्ये स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापण्याची मागणी सातत्याने केली. आता मुख्यमंत्री बाजार समिती योजनेअंतर्गत प्रत्येक तालुकास्तरावर नवीन कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. याअंतर्गत खेड, मंडणगड आणि दापोली येथे नव्या बाजार समित्यांना मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरच उत्पादने विक्रीसाठी संधी उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळणार आहे. वाहतूक खर्च आणि वेळेची बचत होऊन स्थानिक आर्थिक व्यवहारांना ही चालना मिळेल. परिणाम, शेतकऱ्यांचे उत्पन्न ही निश्चितपणे वाढीस लागेल. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी राज्यमंत्री योगेश कदम यांनी सातत्याने पाठपुरावा करत शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रभावी भूमिका बजावली आहे.

## हातात तलवार घेऊन दहशत माजवणाऱ्या गुन्हेगाराला घुग्गुस पोलिसांनी केली अटक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, घुग्घुस (चंद्रपूर) :** घुग्घुस शहरात हातात तलवार घेऊन नागरिकांमध्ये दहशत पसरविणाऱ्या गुन्हेगाराला घुग्घुस पोलिसांनी अटक केली. सदर आरोपीवर अनेक गुन्हे दाखल असून त्याला ६ महिन्याकरिता हद्दपार करण्यात आले होते अशी माहिती आहे. दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी नाणी उर्फ कार्तिक स्वामी कोडापे राहणार एलसीएच क्वार्टर नकोडा हा सायंकाळी ६ वाजेदरम्यान लता मंगेशकर चौकात हातात तलवार घेऊन स्थानिक नागरिकांमध्ये दहशत निर्माण करीत होता. याबाबत घुग्घुस पोलिसांना माहिती मिळताच त्याला तात्काळ अटक करण्यात आली. आरोपी नाणी उर्फ कार्तिक कोडापे यांच्यावर अनेक गुन्हे दाखल असून जानेवारी २०२५ मध्ये चंद्रपूर पोलीस दलाने ६ महिन्याकरिता जिल्हा हद्दपारीची कारवाई करण्यात आली होती, मात्र आरोपी हा पोलिसांची नजर चुकवीत हद्दपार कारवाईला न जुमानता घुग्गुस शहरात दाखल झाला व नागरिकांमध्ये दहशत निर्माण करायला लागला. विशेष बाब म्हणजे हद्दपारीची कारवाई आरोपीवर झाली असताना सदर आरोपी घुग्गुस शहरात आला कसा? पोलिसांची गुप्तचर यंत्रणेला त्या आरोपीची चाहूल का बरं लागली नाही असे अनेक प्रश्न यावेळी निर्माण झाले आहे. सदरची यशस्वी कारवाई घुग्घुस पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि तायवाडे, पोलीस कर्मचारी संजय आतकूलवार, रवि वाभीटकर, नितीन मराठे, महेश भोयर व विजय ढपकस यांनी केली.

## पालकमंत्री अतुल सावे यांचा नांदेड दौरा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, नांदेड :** राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे सोमवार, दिनांक २१ एप्रिल २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ६ वा. छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने नांदेडकडे प्रयाण. सकाळी १० वा. शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आगमन व राखीव. दुपारी ३.४५ वा.

शासकीय विश्रामगृह नांदेड येथून श्री. गुरू गोविंदसिंगजी विमानतळ नांदेडकडे वाहनाने प्रयाण. सायं. ४.१० वा. श्री गुरु गोविंदसिंगजी विमानतळ नांदेड येथे आगमन व राखीव. सायं. ५.१० वा. श्री. गुरु गोविंदसिंगजी विमानतळ नांदेड येथून विमानाने पुणेकडे प्रयाण करतील.